**महत्वाचे / तातडीचे**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माहिती व तंत्रज्ञान विभाग
पिंपरी – ४११० १८
क्र.मातवि/४/कावि/१५२/२२
दिनांक- ९ / ०५ /२०२२

प्रति,
सर्व संबंधित विभागप्रमुख
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११० १८

विषय:- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर विभागप्रमुख या सदरांतर्गत विभागप्रमुखांचे सध्यस्थितीतील छायाचित्र व इतर प्रसिध्द केलेली सर्व माहिती अपलोड करणेबाबत...
संदर्भ:- श्री. सरदार रविंद्र सिंह यांचे दि. ०२/०५/२०२२ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय पत्राद्वारे श्री. सरदार रविंद्र सिंह यांनी पालिकेच्या संकेतस्थळावर पालिकेच्या विभागप्रमुखांचे फोटो व माहिती अपलोड करणेत आली असुन त्यामधील फोटो हे वर्तमानकाळातले नसुन भुतकाळातले दिसुन येत आहेत तसेच संबंधित विभाग आपले विभागाशी संबंधित माहिती ही वेळोवेळी अद्ययावत करत नसलेबाबत कळविले आहे.

तरी सदर पत्रान्वये सर्व संबंधित विभाग / विभागप्रमुखांना कळविणेत येते की सर्व संबंधित विभागांनी मनपा संकेतस्थळावरील विभागप्रमुखांच्या माहिती अंतर्गत प्रसिद्ध केलेले फोटो तसेच माहितीमध्ये काही बदल असल्यास संकेतस्थळावर अपलोड करणेकामी माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे पाठविणेत यावी. तसेच मनपा संकेतस्थळावर विविध विभागांतर्गत प्रसिद्ध करणेत येणा-या माहितीमध्ये काही बदल असल्यास तसे बदल करुन वेळोवेळी सदर माहिती संकेतस्थळावर अद्ययावत /अपलोड करणेत यावी व मनपा संकेतस्थळावरील सर्व माहिती अद्ययावत राहील याची दक्षता घ्यावी.

मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी
माहिती व तंत्रज्ञान विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

सोबत –दि. २/५/२०२२ चे पत्र

Mobile +91- 93717 59500

# Sardar Ravinder Singh

R.T.I. Activist & Social Worker

31/1 A, Ashirwad Building, Dapodi, Pune 411 012. Maharashtra (India) E-mail : socialworkerspune@gmail.com

दिनांक : ०२/०५/२०२२.

| | |
|---|---|
| माहिती व तंत्रज्ञान विभाग ,<br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका मुंबई-पुणे रोड,<br>मुख्य कार्यालय, चौथा मजला ,<br>पिंपरी-४११०१८. | श्री.राजेश पाटिल,<br>आयुक्त,<br>पिंपरी चिंचवड महानगर पालिका,<br>पिंपरी पुणे,४११०१८. |

**विषय : नागरिकाची फसवणुक होउन जनहिताला धोखा होउ शक्ते व याने जनतेचा नुकसान होणार ,आपण स्मार्ट सिटी मध्ये आहोत,आपल्या पालिकेला स्मार्ट सिटी म्हणतो पण कार्य त्याचे उलट करत आहात.**

माननीय महोदय,

मी एक सोशल वर्कर आहे, मी माहिती अधिकाराचे अर्ज व अन्य सार्वजनिक हिताच्ये कार्य करतो.

मी हे पत्र पिं.चिं. महानगरपालिकेच्या काही विभांगाचे अधिकारी व कर्मचारी हे साधे सोपे वेबसाइटवर आपल्या विभागाची माहिती डे टु डे अपडेट करु शकत नाहीत तर यांना पगारी का देत आहे.

१) आज ही आपल्या संकत स्थळावर प्रकट केलेली माहिती व वास्तविकता असलेली माहिती या मध्ये फरक का ?

२) आपल्या विभागाचे अधिकारी यांचे फोटो दर वर्षी अपडेट का करत नाही ? आज ही काहीची फोटो १० ते १५ वर्ष जुनी अपलोड करण्यात आलेली आहे,हे आहे का स्मार्ट सिटी ?

३) आज ही आपले विभाग शासनाचे आदेश आपल्या पालिकेचे परिपत्रकानुसार कार्य करत नसुन त्याचे उलट कार्य करत आहे ,हे आहे का का स्मार्ट सिटी ?

तरी माझी हे मागणी आहे कि माझे हे पत्र मिळताच आपले संकेत स्थळावरील सर्व माहिती अपडेट करुन घेणे व माझ्या द्वारा केलेली या तक्रारी नतंर कामचोर अधिकारी यांच्यावर कडक कारवाई करणे व त्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाच्या नियमानुसार शिस्तभंग,कतृव्यात कसुर,दफ्तर दिरगांई व अन्य कारवाई चे आदेश तातडीने देणे हे नम्र विनंती .

आपण मला सहकार्य कराल अशी आशा मी आपलयाकडून ठेवत आहे.

आपलं आभारी,

सरदार रविन्द्र सिंह